# देवळा पंचायत समिती, देवळा, जिल्हा नाशिक या संस्थेचा सन २००७ – २००८ या वित्तीय वर्षाचा लेखापरीक्षण अहवाल

जा.क्र.स्था/३/ब/जिप/पंस-देवळा/लेपअ/नाशिक/

उपमुख्य लेखा परीक्षक,
स्थानिक निधी लेखा, नाशिक
लेखा कोष भवन, तिसरा मजला,
जिल्हाधिकारी कार्यालयाचे आवार,
नाशिक
दिनांकः-

**प्रेषक,**

उपमुख्य लेखा परीक्षक,
स्थानिक निधी लेखा, नाशिक

**प्रति,**

मा. मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, नाशिक

देवळा पंचायत समिती, देवळा, जिल्हा नाशिक या संस्थेचे सन २००७ – २००८ या वित्तीय वर्षाचे लेखा परीक्षण श्री. र. ह. झगडे, निवड श्रेणी लिपीक, स्थानिक निधी लेखा, नाशिक यांनी दिनांक २६.८.२००८ ते १९.९.२००८ या कालावधीत पूर्ण केले. श्री. सु. ध. ठाकरे, लेखा परीक्षा अधिकारी (प्रभारी), स्थानिक निधी लेखा, नाशिक यांनी दिनांक २९.९.२००८ रोजी पूर्नविलोकन केले व श्री. वि. ए. कोते, उपमुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, नाशिक यांनी या अहवालावर चर्चा करुन अहवालाचे अंतिमीकरण दिनांक १६.१०.२००८ रोजी केले.

लेखा परीक्षीत आर्थिक वर्षामध्ये खालीलप्रमाणे पदाधिकारी व अधिकारी संस्थेचे कामकाज पहात होते.

**सभापती**

| | |
|---|---|
| सौ.लक्ष्मीबाई नारायण शेवाळे | १.४.२००७ ते ३१.३.२००८ |

**गटविकास अधिकारी**

| | |
|---|---|
| १) श्री.आर.झेड.मोहिते (उच्चश्रेणी) | ०१.४.२००७ ते ०६.६.२००७ |
| श्री. पी. आर. हिरे (प्रभारी), विस्तार अधिकारी (ग्रा.पं.) | ०७.६.२००७ ते २२.१.२००८ |
| श्री. एस. जी. पाटील (प्रभारी), एकात्मिक बाल विकास योजना अधिकारी | २३.१.२००८ ते ३१.३.२००८ |

## भाग पहिला
## (मागील लेखा परीक्षण )

मागील लेखापरीक्षण अहवालातील खालील परिच्छेद थकीत असून त्याबाबत मा. विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांचेकडे स्वतंत्ररित्या पत्रव्यवहार सुरु आहे.

| अ. क्र. | वर्ष | परिच्छेद क्रमांक | एकूण परि. |
|---|---|---|---|
| १ | २००२-०३ | ३,४,५,६,७ | ५ |
| २ | २००३-०४ | ३,१५,१६,१७,१८,१९,२० | ७ |
| ३ | २००४-०५ | ३,४,५,६,८,९,१०,११,१२,१३,१४,१५,१७,१९,२०,२१,२२,२३,२४<br>पंचायत राज समिती लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालात समाविष्ठ<br>परि.क्र. २३:- अपूर्ण बांधकामाबाबत. (४.३१२)(२९) | १९ |
| ४ | २००५-०६ | ३,४,५,६,९,१०,११,१३,१४,१९<br>पंचायत राज समिती लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालात समाविष्ठ<br>परि.क्र. ४ :- पंचायत समिती सेस अनुदानातून '१४ समाजकल्याण' लेखाशिर्षाअंतर्गत मागासवर्गीय लाभार्थ्यांना शौचालय अनुदान वाटपबाबत. (४.४०७)<br>परि.क्र. ५ :- पंचायत समिती सेस अनुदानातुन महिला व बालकल्याण योजनेंतर्गत मागासवर्गीय लाभार्थ्यांना शौचालय अनुदान वाटपाबाबत. (४.६१२) | १० |

**लेखा परीक्षण अहवाल सन २००६ – २००७**

| | |
|---|---|
| परि.क.३ | अंदाजपत्रकाबाबत. |
| परि.क.४ | पंचायत समिती वाढीव उपकरांतून केलेल्या बांधकामातील अनियमितता. (पंरास प्रस्तावित) |
| परि.क.५ | पंचायत समिती वाढीव उपकरांतून अंगणवाड्यांना पिंप पुरविणे. |
| परि.क.६ | जवाहर विहीरी अनुदान वाटपाबाबत. (पंरास प्रस्तावित) |
| परि.क्र.७ | आयकर कपात न करणेबाबत. |
| परि.क.८ | व्यवसाय कर कपात न करणेबाबत. |
| परि.क.९ | अनामत रक्कमा व्यपगत करणेबाबत. |
| परि.क.१० | थकीत अग्रीम रक्कमा वसूलीबाबत. (पंरास प्रस्तावित) |
| परि.क.११ | ग्रामसेवकांच्या दैनंदिन्या विहीत मुदतीत प्राप्त नसतांना वेतन व भत्ते प्रदान करण्यातील अनियमितता. |
| परि.क.१२ | अर्धसमास पत्रांचे उत्तर न देणेबाबत. |
| परि.क.१३ | पंचायत समिती वाढीव उपकर नोंदवहीतील न वाटलेल्या धनादेशाबाबत. |
| परि.क.१४ | मुदतबाह्य धनादेश प्राप्त करुन रद्द न केलेबाबत. |

| | |
|---|---|
| परि.क्र.१६ | अपूर्ण बांधकामाबाबत. (कृषि विभाग) (पंरास प्रस्तावित) |
| परि.क्र.१७ | प्रलंबित परिच्छेदांचे अनुपालनाबाबत. |
| परि.क्र.२० | वार्षिक लेखे. |
| परि.क्र.२१ | लेख्यांची स्थिती. |
| परि.क्र.२२ | अनुपालन व पोहोच. |

टिप :- उपरोक्त नमुद केलेल्या आक्षेपांचे संदर्भात त्या त्या वर्षाच्या पुढील अभिप्रायात नमुद केलेले आक्षेप क्रमांकच अंतीम समजणेत यावेत.

## भाग दुसरा
## (चालु लेखापरीक्षण)

---

## मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम १९३० चे कलम ९ (अ) खालील अनियमितता.

---

**परिच्छेद क्रमांक ३ :- अंदाजपत्रकीय तरतुदीपेक्षा जादा केलेल्या खर्चाबाबत.**

पंचायत समिती देवळाचे सन २००७ – २००८ चे मुळ अंदाजपत्रक पंचायत समिती ठराव क्रमांक २३५ दिनांक १५.२.२००७ व सुधारीत अंदाजपत्रक ठराव क्रमांक ४० दिनांक १५.२.२००८ अन्वये मंजुर केलेले आहे. प्रत्येक शिर्षाखाली केलेल्या तरतुदीचा व प्रत्यक्ष खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

(आकडे रुपयांत)

| अ.क्र. | शिर्षक | सुधारीत तरतुद | प्रत्यक्ष खर्च | कमी खर्च | जादा खर्च |
|---|---|---|---|---|---|
| १ | ३ शिक्षण | २५,००० | -- | २५,००० | -- |
| २ | ४ (इवद) बांधकाम | २,४७,५०० | - | २,४७,५०० | -- |
| ३ | ९ सार्व. आरोग्य | २०,००० | १२,६०० | ७,४०० | -- |
| ४ | ११ शेती | २५,००० | -- | २५,००० | -- |
| ५ | १२ पशुसंवर्धन | १५,००० | -- | १५,००० | -- |
| ६ | १४ समाजकल्याण | ९५,००० | १,५९,५७० | - | ६४,५७० (मागील अनुदाने खर्च) |
| ७ | २० संकिर्ण (मबाक) | ४७,५०० | ४७,०९२ | ४०९ | -- |
| | एकुण | ४,७५,००० | २,१९,२६२ | ३,२०,३०८ | ६४,५७० |

पंचायत समिती सेस रोखवहीनुसार दिनांक १.४.२००७ रोजी सुरुवातीची शिल्लक रुपये १,०५,७७८/-, प्राप्त अनुदान रुपये २,२४,९४१/-; अशी एकूण जमा रक्कम रुपये ३,३०,७१९/- असून खर्च रुपये २,१९,२६२/- झालेला आहे. अखेर शिल्लक रक्कम रुपये १,११,४५७/- आहे.

सदर खर्चावर खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

१) सन २००७ – २००८ मध्ये ३ शिक्षण, ९ सार्व.आरोग्य, ११ शेती, १२ पशुसवंर्धन, या शिर्षाखाली तरतुद करुनही खर्च करण्यांत आलेला नाही, या अनियमिततेस पंचायत समितीचे क्षमापन घेऊन अनुपालन दर्शवावे.

२) अंदाजपत्रक रुपये ५,००,००० चे केले असून खर्च मात्र रुपये १,९७,२२०/- म्हणजे सुमारे ३९% केला आहे. जमेचा अंदाज घेऊनच अंदाजपत्रक व प्रत्यक्ष नियोजन व पुढील अंमलबजावणी झालेली नाही. ही बाब पंचायत समितीच्या विशेषत्वाने लक्षात आणावी

३) १४ समाजकल्याण लेखाशिर्षाखाली मागील शिल्लक अनुशेषावर खर्च करण्यांत आलेला आहे. तथापि मार्च २००८ अखेर अद्याप किती अनुशेष बाकी आहे. याबद्दल स्वतंत्र रोखवहीत हिशोब ठेवण्यांत आलेला नाही. त्यामुळे मागील शिल्लक अनुशेषाची पडताळणी करता आली नाही. याबाबत अद्ययावत हिशोब ठेऊन अनुपालन दाखवावे.

४) यापुढे वास्तव स्वरुपात तरतुद व नियोजन अचुक करुन अंदाजपत्रक योग्य प्रकारे तयार करण्याची दक्षता घ्यावी.

वरीलप्रमाणे आक्षेपांची पुर्तता करुन अनुपालन लेखापरीक्षणांस दाखविण्यांत यावे.

---

**परिच्छेद क्रमांक ४ :- १०% अनुदानाने सौर कंदील खरेदीबाबत**

| | |
|---|---|
| प्रशासकीय मंजूरी | पंचायत समिती ठराव क्रमांक ३२ दिनांक २३.११.२००७ |
| तांत्रिक मंजूरी | मा. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांचे पत्र क्र. सक/४/१५८/०८ दि. २०.१.२००८ |
| अदा रक्कमेचा तपशिल | प्र.क्र. १ दिनांक ३१.३.२००८ अन्वये रक्कम रुपये १,५९,५७०/- मे. एन टेक सोलर सिस्टीम यांना ४५ नग सौर कंदील खरेदीपोटी प्रती नग ३४०९.६२ दिले. |

सदर खर्चाचा तपशीलावर खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यांत येत आहे.

१) उपरोक्त नमुद तांत्रिक मंजूरीचे शर्ती व अटींनुसार ३०% लाभ हा आता संदर्भीय अनुदान स्त्री लाभार्थ्यांना देणे आवश्यक असतांना रक्कम दोन लाभार्थी स्त्रीयांना लाभ देण्यात आलेला आहे.

२) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या लेखा संहिता नियम ५० नुसार प्रत्येक लाभार्थ्यांना नमुना नंबर १० मध्ये लाभार्थी हिस्सांबाबत पावती देणे आवश्यक असतांना सर्व लाभार्थींची खालीलप्रमाणे फक्त दोन पावत्या फाडण्यात आलेल्या आहेत.

| पावती क्रमांक | दिनांक | रक्कम रुपये | तपशिल |
|---|---|---|---|
| ३१२६३२ | २१.६.२००८ | ७,११० | २० लाभार्थी |
| ६१२६३९ | २८.७.२००८ | ८,८७५ | २५ लाभार्थी |
| | **एकूण** | **१५,९८५** | |

उपरोक्त नमुद नियमानुसार प्रत्येक लाभार्थ्यास रक्कमेची पावती देणे आवश्यक असतांना एकत्रित पावती देणे अनियमित आहे.

३) सदरची खरेदी मे. सनटेक सोलर सिस्टीम यांचा शासनासोबत झालेला दर क्र. आई एन /एन.पी.व्ही./५७/०६/५८१८ दिनांक १३.९.२००६ नुसार करण्यांत आलेली आहे. त्यानुसार ७०% रक्कम ही साहित्य मिळाल्यावर व उर्वरित ३०% रक्कम ही सौर कंदील व्यवस्थित सुरु झाल्याची खात्री झाल्यानंतर देणे आवश्यक होते. तथापि पंचायत समितीने पूर्ण रक्कम अदा केलेली आहे. तरी सर्व सौरकंदील व्यवस्थित सुरु असल्याचे प्रमाणित करुन उपयोगिता प्रमाणपत्रासह अनुपालन लेखापरीक्षणांस दाखविण्यांत यावे.

४) अ.क्र. ३ मध्ये नमुद केलेल्या दर करारातील तरतुदीनुसार कंपनीने लाभार्थ्यासोबत ५ वर्षाचा सर्वकष देखभाल व दुरुस्ती (Compresive maintenance contract) करार करणे आवश्यक आहे. परंतु याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे भविष्यात सौर कंदिल नादुरुस्त झाल्यास त्याची उपयोगिता संपुष्टात येऊन योजनेचा उद्देश सफल होणार नाही. तरी दर करारानुसार कार्यवाही करुन अनुपालन लेखापरीक्षणांस दाखविण्यांत यावे.

उपरोक्त नमुद आक्षेपांची पुर्तता करुन अनुपालन लेखापरीक्षणांस दाखविण्यात यावे. तो पावेतो खर्च रक्कम रुपये १,५९,५७०/- लेखापरीक्षणांस आक्षेपाधिन ठेवण्यांत येत आहे.

लेखाशिर्ष<br>समाजकल्याण<br>पंचायत समिती सेस<br>आक्षेपाधिन रक्कम रुपये १,५९,५७०/-

---

**परिच्छेद क्रमांक ५ :- वजनकाटे खरेदीबाबत. (पं.स.सेस)**

प्रशासकीय मंजुरी :- पं.स.ठराव क्र.४२ दिनांक १५.२.२००८<br>
तांत्रिक मंजुरी :- ग.शि.अ. पत्र क्र. एबाविसेयो/३६ दिनांक २२.२.२००८<br>
अदा रकमेचा तपशिल :- प्रमाणक क्रमांक २ दिनांक ३१.३.२००८ नुसार रक्कम रुपये ४७,०७०/- नितीशन इंजिनिअर्स, प्रा.लि. धुळे यांचेकडून ९ नग वजनकाटे प्रती नग रुपये ४,६४८.८९ प्रमाणे खरेदी

सदर खर्चावर खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

१) वजनकाट्यांचे उपयोगिता प्रमाणपत्रे घेण्यात आलेले नाही. सदर उपयोगिता प्रमाणपत्रे येऊन अनुपालन दाखविण्यात यावे.

२) वजनकाटे हे नमुद दर करारानुसार योग्य त्या मानांकनाचे प्राप्त झाल्याचे वजनमापन अधिकारी यांचेकडून प्रमाणित केलेले नाही. ते प्रमाणित करण्यात यावे.

उपरोक्त नमुद आक्षेपांची पूर्तता करुन अनुपालन लेखापरीक्षणात दाखविण्यात यावे, तोपर्यंत खर्च रक्कम रुपये ४७,०७०/- आक्षेपाधिन ठेवण्यांत येत आहे.

लेखाशिर्ष<br>ए.बा.वि.यो.<br>पं.स.सेस<br>आक्षेपाधिन रक्कम रुपये ४७,०७०/-

---

## मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम १९३० चे कलम ९ (ब) खाली येणारी अनियमितता.

### परिच्छेद क्रमांक ६ :- वाहनाचा कार्यक्षेत्राबाहेर वापर केलेबाबत.

पंचायत समिती, देवळा यांचेकडील वाहन क्र. एम.एच. १५ एए ५०२० ची वाहन रोजनिशी तपासली असता या अहवालासोबत जोडलेले परिशिष्ट क्रमांक १ नुसार वाहनाचा पूर्व परवानगी शिवाय कार्यक्षेत्राबाहेर वापर केलेला आहे.

शासन निर्णय, ग्रामविकास विभाग क्र. जेईपी/२४६९/१७७०३/डी-१/ दिनांक १४.११.१९६९ अन्वये वाहनाचा कार्यक्षेत्राबाहेर वापर करणेपूर्वी मुख्य कार्यकारी अधिकारी यांची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक असतांना तशी मंजूरी घेणेत आलेली नाही. सबब याबाबत शासन निर्णय वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक प्रवास-१००५/प्र.क्र.३३/ ९०/सेवा-५/दि. ८.७.२००५ अन्वये प्रति किमी रुपये ८/- प्रमाणे १२४२९ किमी. प्रवासाची रक्कम रुपये ९९,४३२/- संबंधितांकडून वसूल करुन अनुपालन लेखापरीक्षणास दाखवावे.

वसूलपात्र रक्कम रुपये ९९,४३२/-

### परिच्छेद क्रमांक ७ :- ग्रामपंचायत विभागाकडील प्रलंबित खास प्रतिवृत्तातील अपहारीत रक्कमेबाबत.

पंचायत समिती, देवळा येथील सन २००७-०८ चे लेखा परीक्षणांत ग्रामपंचायत विभागाकडील अहवालासोबतचे परिशिष्ट क्रमांक ७ नुसार खास प्रतिवृत्त ग्रामनिधी, एन.आर.पी., ज.रो.यो., संपूर्ण रोजगार योजनांकडील एकूण प्रकरणे ९ असून त्यामधील काही अपहारीत रक्कमांची वसुल करण्यात आली आहे व उर्वरित रक्कम वसूल करणे बाकी आहे. अपहारीत रक्कमा त्वरीत वसूल करण्याची कार्यवाही करण्यात यावी. खालील प्रमाणे नमुद रक्कमा वसूल करणे बाकी आहे.

| तपशिल | अपहारीत रक्कम | वसुल केलेली | वसुल होणे बाकी |
|---|---|---|---|
| ग्रामनिधी, | ३१,४५८ | १८,८७४ | १६,५८४ |
| एन.आर.इ.पी.ज.रो.यो,संपूर्ण रोजगार योजना | १,२८,१५१ | ८९,८२८ | ३८,३२३ |
| **एकूण** | **१,५९,६०९** | **१,०४,७०२** | **५४,९०७** |

सदरची रक्कम खास प्रतिवृत्त अहवालांतील असल्याने वसुल रक्कमेचे समायोजन करु नये. तरी वसुली करुन योग्य त्या शिर्षाखाली भरणा करावी व तसे अनुपालन लेखा परीक्षणात दर्शवावे.

**परिच्छेद क्रमांक ८ :- हातपंप विजपंप वर्गणी थकबाकीबाबत.**

सन २००७ – २००८ मध्ये ठेवण्यात आलेल्या हातपंप / विजपंप देखभाल दुरुस्ती वर्गणी नोंदवहीची पडताळणी केली असता, सोबतच्या परिशिष्ट क्र. २ मध्ये दर्शविण्यात आल्याप्रमाणे वर्गणी रक्कम रुपये २१,१०६ /- अद्यापही ग्रामपंचायतीकडून वसूल होणे बाकी आहे.

याबाबत पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचे आदेश क्र. भूजल/१०९५/ प्र.क्र.२१७/४३/दिनांक १७.१.१९९६ अन्वये हातपंप विजपंपाची देखभाल दुरुस्तीची प्रलंबित वर्गणी संबंधित ग्रामपंचायतींकडून रोख स्वरुपात अथवा देय अनुदानातून त्वरीत वसुल करुन लेखापरिक्षणास अनुपालन दर्शवावे.

---

## मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम १९३० चे कलम ९ (क) खालील येणारी अनियमितता.

**-निरंक-**

---

## मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम १९३० चे कलम ९ (ड) खालील येणारी अनियमितता.

---

**परिच्छेद क्रमांक ९ :- दप्तर तपासणी लक्षांकाबाबत.**

सन २००७ – २००८ वर्षात ग्रामपंचायत विभागाकडील क्षेत्रीय अधिकारी यांना किती दप्तर तपासणीचे लक्षांक देण्यांत आले होते, किती पूर्ण केले, त्यात आढळून आलेल्या गंभीर अनियमितता व केलेली कार्यवाही याबाबत अर्धसमासिय पत्र क्रमांक ४४ दिनांक २०.९.२००८ अन्वये माहिती मागविण्यांत आली. सदर तपशीलान्वये सोबत जोडलेले परिशिष्ट क्रमांक ३ नुसार दप्तर तपासणीचे कमी उद्दिष्ट साध्य पार पडलेले असल्याचे दिसून येते.

दप्तर तपासणी हे प्रशासनाच्या प्रभावी नियंत्रणाचा भाग असून जो पूर्ण करणे आवश्यक आहे, जेणेकरुन संभाव्य होणारे गैरव्यवहारी प्रकार यावर वेळीच नियंत्रणात ठेवणे शक्य होईल. कमी दप्तर तपासणी साध्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे क्षमापन घेऊन अनुपालन लेखापरिक्षणांस दाखविण्यांत यावे.

---

**परिच्छेद क्रमांक १० :- शालेय पोषण आहाराच्या रक्कमा रेखांकित धनादेश न दिल्याबाबत.**

पंचायत समिती देवळा अंतर्गत शिक्षण विभागाकडील तालुका मास्तर कार्यालयाकडील रोकडवहीची पडताळणी केली असता पंचायत समितीकडून प्राप्त झालेले धनादेशाचे वाटप (शालेय पोषण आहार) करतांना रेखांकित धनादेश न करता बेअरर देण्यात आलेले आहेत. मार्च २००८ मध्ये खालीलप्रमाणे पंचायत समिती देवळा कार्यालयाकडून प्राप्त रक्कमा तालुकामास्तर कार्यालयाने बेअरर धनादेशाद्वारे प्रदान केलेल्या आहेत.

| प्र.क्र. | दिनांक | रक्कम (रुपये) | तपशिल |
|---|---|---|---|
| ४१ | १७.३.२००८ | १८,५६,७७२ | १.१०.०७ ते ३१.१.२००८ शालेय पोषण आहाराचे अदा |
| ८१ | ३१.३.२००८ | १,१९,००० | नमुद नाही शालेय पोषण आहाराचे अदा |
| १०४ | ३१.३.२००८ | १०,४१,२५१ | फेब्रु/मार्च/०८ शालेय पोषण आहाराचे अदा |
| ११३ | ३१.३.२००८ | ४,७९० | जून/जुलै/०७ शालेय पोषण आहाराचे अदा |
| | एकूण | ३०,२१,८१३ | |

शालेय पोषण आहाराचे धनादेश मुख्याध्यापक, ग्रामशिक्षण समिती यांच्या नावे रेखांकित करुन देणे आवश्यक असतांनाही तशी कार्यवाही तालुका मास्तर कार्यालयाने केलेली नाही. याबाबत अनियमितता / गैरव्यवहार नसल्याची खात्री करुन जबाबदारी निश्चित करण्यात यावी व अनुपालन लेखापरीक्षणांस दाखविण्यांत यावे.

---

**परिच्छेद क्रमांक ११ :- शिक्षण विभागाकडील निवृत्ती वेतन प्रदानाबाबत.**

१) शिक्षण विभागाकडील निवृत्ती वेतन प्रदानांची पडताळणी केली असता निवृत्ती वेतन बिलासाठी अधिकृत नमुना नंबर १२ मधील वेतन बील वापरण्यात आलेले नसून नमुना नंबर २६ मध्ये काढण्यात आलेले आहे. सदरची निवृत्ती वेतन बिले ए.पी.पी. १२ मध्ये काढणे आवश्यक आहे.

२) खालील नमुद केलेल्या निवृत्ती वेतन धारकांचे बँक खाते क्रमांक नमुद नसतांना पेन्शनच्या रक्कमा प्रदान करण्यात आलेल्या आहेत.

१. श्री. पवार दावल रामभाऊ
२. श्री. बधान प्रकाश गोपाळ
३. श्री. देवरे इंदूमती पुंडलिक
४. श्री. जाधव निंबा सुकदेव
५. श्री. पवार भिमराज महादु
६. श्री. ठाकरे जगन्नाथ त्र्यंबक
७. श्रीमती. गांगुर्डे यमुना अमृतराव

८. श्री. शिरसाठ प्रकाश पंडीत

फेब्रुवारी पेड इन मार्च २००८ च्या निवृत्ती वेतन देयकांत संबंधित वेतनधारकांचे बँक खाते नमुद नसतांना रक्कमा काय आधारे प्रदान करण्यात आल्या सदरच्या रक्कमा संबंधितांच्या खाती जमा झाल्या किंवा नाही, याबाबत प्रशासनाने योग्य चौकशी करावी व तसे अनुपालन लेखापरीक्षणास सादर करावे. यात काही गैरप्रकार नसल्याचे प्रमाणित करावे.

**परिच्छेद क्रमांक १२ :- जिल्हा निधी रोकडकिर्दीतील रक्कमांच्या पोच पावत्या उपलब्ध न झाल्याबाबत.**

पंचायत समिती देवळा येथील सन २००७ – २००८ चे लेखापरीक्षण केले असता जिल्हा निधी रोकडकिर्दीचे व देयकांचे रेखांकन करतांना अहवालासोबत जोडलेल्या परिशिष्ट क्रमांक "४" प्रमाणे माहे सप्टेंबर २००७ व मार्च २००८ मधील प्रदानासंबंधित पोच पावत्या तोंडी व अर्धसमास पत्र क्रमांक १ दिनांक २९.८.२००८ अन्वये मागणी करुन उपलब्ध करण्यात आलेल्या नाहीत. जिल्हा निधी रोकडवहीप्रमाणे संबंधितांना रक्कमा प्रदान केल्याचे दर्शविलेले आहे. तथापि संबंधितांना प्रदान रक्कमा प्राप्त झाल्याच्या पोच पावत्या प्राप्त केलेल्या नाहीत. त्यामुळे प्रदान रक्कमा संबंधितांना प्राप्त झाल्याची खात्री करता आलेली नाही, तरी त्याबाबत पूर्तता करुन अनुपालन लेखापरीक्षणाला दर्शवावे.

**परिच्छेद क्रमांक १३ :- नादुरुस्त निवासस्थानाबाबत.**

पंचायत समिती अंतर्गत पशुसंवर्धन विभागाकडील खालील निवासस्थाने नादुरुस्त असल्याने रिक्त असल्याचा खुलासा अर्धसमासिय पत्र क्रमांक ३५ दिनांक २९.८.२००८ अन्वये मागविण्यांत आलेल्या माहितीनुसार करण्यात आलेला आहे.

| अ.क्र. | ठिकाण | निवासस्थान संख्या | रिक्त असल्याची कारणे |
|---|---|---|---|
| १ | पशुवैद्यकीय दवाखाना, देवळा | १ | नादुरुस्त |
| २ | पशुवैद्यकीय दवाखाना, खर्डी | ३ | नादुरुस्त |
| ३ | पशुवैद्यकीय दवाखाना, खामखेडा | २ | नादुरुस्त |
| ४ | पशुवैद्यकीय दवाखाना, भऊर | १ | नादुरुस्त |

नादुरुस्त निवासस्थान दुरुस्त करणेबाबत निश्चित स्वरुपाची कार्यवाही करण्यांत यावी, जेणेकरुन शासनाचे वेतन बिलातून देण्यांत येणारे घरभाडे भत्ता अनुदानाचे रक्कमेमध्ये बचत होऊ शकेल. तसेच संबंधित कर्मचारी अधिकृत निवासस्थानी वास्तवास असल्याने त्यांच्या सेवा पूर्णत: उपलब्ध असतील तरी सदरचे निवासस्थान दुरुस्तीबाबत त्वरीत कार्यवाही करुन अनुपालन लेखापरीक्षणांस दाखविण्यांत यावे.

**परिच्छेद क्रमांक १४ :- अवितरीत धनादेशाबाबत.**

पंचायत समितीकडील जिल्हानिधी रोकडवही आणि धनादेश पुस्तक यांची पडताळणी केली असता खाली नमुद केलेले धनादेश अद्यापही संबंधितांना प्रदान करणेत आलेले नाहीत.

| दिनांक | धनादेश क्रमांक | रक्कम (रुपये) | तपशिल |
|---|---|---|---|
| ३१.३.२००८ | ११५४४ | ५०० | गरीब महिला व्यवसाय अनुदान |
| ३१.३.२००८ | ११५४६ | ५०० | गरीब महिला व्यवसाय अनुदान |
| ३१.३.२००८ | ११८८८ | १,५०० | पीक स्पर्धा बक्षिस अनुदान |
| ३१.३.२००८ | ११८९२ | १,००० | पीक स्पर्धा बक्षिस अनुदान |
| ३१.३.२००८ | ११८९६ | २,५०० | पीक स्पर्धा बक्षिस अनुदान |
| ३१.३.२००८ | ११८९७ | १,५०० | पीक स्पर्धा बक्षिस अनुदान |
| ३१.३.२००८ | ११८९८ | १,००० | पीक स्पर्धा बक्षिस अनुदान |
| ३१.३.२००८ | ११९०० | १,५०० | पीक स्पर्धा बक्षिस अनुदान |
| ३१.३.२००८ | ११९०४ | १,००० | पीक स्पर्धा बक्षिस अनुदान |
| ३१.३.२००८ | ११९०५ | २,५०० | पीक स्पर्धा बक्षिस अनुदान |
| ३१.३.२००८ | ११९०६ | १,५०० | पीक स्पर्धा बक्षिस अनुदान |
| ३१.३.२००८ | ११९०७ | १,००० | पीक स्पर्धा बक्षिस अनुदान |
| ३१.३.२००८ | ११९०९ | १,५०० | पीक स्पर्धा बक्षिस अनुदान |
| ३१.३.२००८ | ११९११ | २,५०० | पीक स्पर्धा बक्षिस अनुदान |
| ३१.३.२००८ | ११९१३ | १,००० | पीक स्पर्धा बक्षिस अनुदान |
| ३१.३.२००८ | ११९१६ | १,००० | पीक स्पर्धा बक्षिस अनुदान |
| | **एकूण -** | **२२,०००** | |

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा सहिता १९६८ चे नियम २७ अन्वये तात्काळ आवश्यकता असल्याशिवाय धनादो काढण्यास अनुमती नाही. असे असतांना गटविकास अधिकारी यांनी त्या त्या लेखाशिर्षाखालील अनुदान व्यपगत होऊ नये म्हणून खर्च नोंदविलेला आहे. मात्र वरील धनादेश संबंधितांना प्रदान करण्यात आले नाही. याबाबत मुख्य कार्यकारी अधिका-यांचे क्षमापन घेऊन पुर्तता दर्शवावी.

---

**परिच्छेद क्रमांक १५ :- प्राथमिक आरोग्य केंद्र, लोहणेर येथील बाह्यरुग्ण फी उशिरा भरणा केलेबाबत.**

पंचायत समिती देवळाकडील प्राथमिक आरोग्य केंद्र लोहणेरची सन २००७ – २००८ च्या रोकडवहीची तपासणी केली असता बाह्यरुग्ण व श्वानदंश फी पोटी

दिनांक १२.७.२००७ ते ३१.३.२००८ या कालावधीत जमा रक्कमा वेळीच भरणा करण्यात आलेल्या नाहीत. दिनांक ३१.३.२००८ अखेर रोकडवहीची शिल्लक खालीलप्रमाणे

१. श्वानदंश फि रुपये २,६००/-

२. ओ.पी.डी. फि रुपये ३२८/-

**एकूण रूपये २,९२८/-** एकूण रोख रक्कम हाती

महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या लेखा संहिता १९६८ चे नियम १३ अन्वये वसूल केलेली रक्कम शक्यतो दररोज जमा करणे आवश्यक आहे, तर नियम ४९ अन्वये कमाल १५ दिवसांत रक्कमेचा भरणा करणे आवश्यक आहे. परंतु तशी कार्यवाही केलेली नाही. उशिरा भरणेबाबत काही गैरप्रकार झाला नसल्याची खात्री पटवावी इतक्या जास्त दिवस बाह्य रुग्ण फी हाती ठेवणे ही नियमबाह्य बाब मुख्य कार्यकारी अधिकारी निदर्शनास आणून त्यांचे क्षमापन घ्यावे व यांचे रक्कम रुपये २,९२८/- संबंधित लेखाशिर्षाखाली भरणा करुन तसे अनुपालन लेखापरीक्षणास सादर करावे.

---

**परिच्छेद क्रमांक १६ :- सर्वसाधारण रोकडवहींचा ताळमेळ न घेतलेबाबत.**

खालील दर्शविलेप्रमाणे सर्वसाधारण रोखवहीतील दिनांक ३१.३.२००८ अखेरच्या शिल्लकेत तफावत आहे.

(आकडे रुपयांत)

| योजना | ३१.३.२००८ रोकडवहीतील अखेरची शिल्लक | बँक खाते शिल्लक | तफावत |
|---|---|---|---|
| अभिकरण | १७,६७,८९६.०० | ३१,५०,४८७.०० | १३,८२,५९१ |
| जिल्हा निधी | ५८,२२,४३२.०० | ७४,४५,२४४.०० | १६,२२,८१२ |
| जि.प. सेस | २३,५३,५५७.५० | २१,००,४१०.५० | २,५३,१४७ |
| पं. स. सेस | १,११,४५७.०० | २,९५,३०७.०० | १,८३,८५० |
| १२ वा वित्त आयोग | ८,३३,२८७.०० | २०,२८,२८१.०० | ११,९४,९९४ |

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या लेखा संहिता १९६८ चे नियम ५७ नुसार दरमहा रोखवही व बँकेनुसार शिल्लक रक्कमेमध्ये तफावतीचे मेळपत्रक तयार केलेले नाही. वेळीच बँक मेळपत्रक तयार न केल्याने त्यात गैरव्यवहार होण्याची शक्यता नाकारता येत नाही. वेळीच नियमानुसार बँक मेळपत्रक न करणेबाबत संबंधितांची जबाबदारी निश्चित करुन मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचे क्षमापन घ्यावे व त्वरीत बँक मेळपत्रक तयार करुन अनुपालन लेखापरीक्षणांस दाखविण्यांत यावे.

---

**परिच्छेद क्रमांक १७ :- परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेबाबत.**

पंचायत समिती, देवळा सन २००७ – २००८ च्या लेखापरीक्षणात ग्रामसेवक आस्थापना लेख्यांची तपासणी केली असता, १ नोव्हेंबर २००५ पूर्वी कंत्राटी / मानधनावर

लागलेल्या परंतु १ नोव्हेंबर २००५ नंतर कायम केलेल्या, या अहवालासोबत जोडलेले परिशिष्ट क्रमांक " ५ " नुसार नमुद कर्मचा-यांना जिल्हापरिषद, नाशिक यांनी भविष्य निर्वाह निधी क्रमांक दिलेला आहे.

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

१) वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक अंनियो १००५/१२६/सेवा-४/दिनांक ३१ ऑक्टोंबर २००५ व शासन निर्णय क्रमांक अंनियो १००७/१८/सेवा-४/ दिनांक ७ जुलै २००७ अन्वये जे कर्मचारी १ नोव्हेंबर २००५ नंतर शासकीय सेवेत कायम करण्यात आले त्यांना महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ लागु होत नाही. त्यामुहे परिशिष्टात नमुद केलेल्या कर्मचा-यांच्या भविष्य निर्वाह निधी खात्यामध्ये होणारी कपात ही चुकीची असून, त्यांना उपरोक्त शासन निर्णयानुसार स्तर १ लागु होतो. त्यात त्यांची मुळ वेतन + महागाई वेतन + महागाई भत्ता या रक्कमेच्या १० टक्के रक्कम कपात करुन ठेव या शिर्षाखाली जमा करावयाची आहे.

२) जे कर्मचारी १ नोव्हेंबर २००५ नंतर शासकीय सेवेत कायम करण्यात आले त्यांच्याबाबत अद्यापही परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजनेची रक्कम कपात करण्यात येत नसल्याने याबाबत जबाबदारी निश्चित करण्यात यावी.

उपरोक्त नमुद केलेप्रमाणे दोन्हीही कर्मचा-यांची शासन निर्णयानुसार परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेचे अंशदान कपात करुन अुनपालन लेखापरीक्षणास दाखवावे.

---

**परिच्छेद क्रमांक १८ :- धनादेश रद्द न केल्याबाबत.**

पंचायत समिती, देवळा येथील सन २००७-०८ चे लेखापरीक्षणामध्ये जिल्हानिधी, अभिकरण योजना निधी रोकडवहयांची पडताळणी केली असता दिनांक ३१.३.२००८ अखेर अधिक काळ मुदतीचे धनादेश रद्द करण्यात आलेले नाहीत, असे स्पष्ट झाले.

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ चे नियम ३१ प्रमाणे सहा महिन्यापेक्षा अधिक काळ न वटलेले धनादेश रदद करुन योग्य त्या लेखाशिर्षाखाली जमा करणे आवश्यक आहे. अहवालासोबत जोडलेल्या परिशिष्ट क्रमांक " ६ " नुसार अनुक्रमे जिल्हा निधी, अभिकरण योजना निधी रोकडवही नुसार नमुद केलेले मुदतबाहय धनादेश रदद करण्यात आलेले नाहीत.

सदर धनादेश रदद करुन रक्कमाचा योग्य त्या लेखाशिर्षाखाली भरणा करुन तसे अनुपालन लेखापरीक्षणास दाखवावे.

---

**परिच्छेद क्रमांक १९ :- रद्द धनादेश जमा करणेतील अनियमिततेबाबत.**

पंचायत समिती सेस चे रोखवहीत दिनांक ३१.३.२००६ चे मुदतबाह्य धनादेश सन २००७ – २००८ मध्ये जमा घेणेत आलेले आहेत. त्यास खालीलप्रमाणे अनियमितता आढळून आल्या.

१) दिनांक १.९.२००७ रोजी धनादेश क्रमांक २९००५३ दिनांक ३१.३.२००६ रक्कम रुपये १,०००/- जमा घेण्यांत आलेला आहे. सदरच्या धनादेश दिनांक ३१.३.२००७ चे बँक मेळपत्रकामध्ये न वटलेल्या धनादेश यादीत नाही. तरीही जमा घेणेचे प्रयोजन समजून येत नाही.

२) दिनांक १.९.२००७ रोजी धनादेश क्रमांक ३३९८५६ दिनांक ३१.३.२००६ रक्कम रुपये १,०००/- हा दिनांक २७.१२.२००६ रोजी वटलेला असतांना पुन्हा जमा घेणे चुकीचे आहे.

३) दिनांक १.९.२००७ रोजी धनादेश क्रमांक २९००१३ दिनांक ३१.३.२००६ रक्कम रुपये १,०००/- हा दोनदा जमा दर्शविलेला आहे. एकच धनादेश जमा घेणे आवश्यक होते.

वरीलप्रमाणे चुकीचे नोंदी घेणेबाबत संबंधितांची जबाबदारी निश्चित करण्यांत येऊन मुख्य लेखा व वित्त अधिका-यांचे क्षमपान घ्यावे. तसेच लेख्यांत योग्य ती दुरुस्ती करुन अनुपालन लेखापरीक्षणांस दाखविण्यांत यावे.

---

**परिच्छेद क्रमांक २० :- गणवेष कापड शिलकेबाबत.**

पंचायत समिती, देवळाकडील सन २००७ — २००८ मधील साठा नोंदवही क्रमांक ३३ ची पडताळणी केली असता खालीलप्रमाणे कापड अद्याप शिल्लक असल्याचे आढळून आले.

| तपशिल | प्राप्त तपशिल | ३१.३.०७ अखेर शिल्लक | १४.२.०८ रोजी प्राप्त | ३१.३.०८ अखेर शिल्लक | दर प्रति. मि. | रक्कम (रुपये) |
|---|---|---|---|---|---|---|
| गणवेष शर्टींग | १२.४.०५ रोजी १२० मी. प्राप्त | १८ मीटर | ११४ मीटर | ३८ मीटर | ३३.५० | १,२७३ |
| गणवेष शुटींग | १२.४.०५ रोजी ७८ मीटर प्राप्त | ११.७० मीटर | ७४.१० मीटर | २३.४ मीटर | ७१.५० | १,६७३ |
| उलन ब्लेझर | २०.३.०६ रोजी ६० मीटर प्राप्त | २७ मीटर | --- | २७ मीटर | १७०.५० | ४,६०३ |
| अस्तर कापड | २०.३.०६ रोजी ८० मीटर प्राप्त | ३६ मीटर | --- | ३६ मीटर | ३२.४० | १,१६६ |
| | | | | | | **८,७१५** |

उपरोक्त नमुद दिनांक ३१.३.२००८ अखेरचा शिल्लक गणवेष कपडा हा अनावश्यक मागणी व खरेदी अंती शिल्लक असून, त्यात सुमारे रुपये ८,७१५/- इतकी रक्कम नाहक गुंतून पडली आहे. सदरचा गणवेष कपडा हा दोन / अडीच वर्षांपासून पडून असल्याने तो खराब होऊन वाटपाअभावी कापड खरेदीवर केलेला खर्च वाया जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी याबाबत संबंधीताची जबाबदारी निश्चित करण्यात यावी व शिल्लक गणवेष कपडा तात्काळ जिल्हापरिषदेस इतरत्र वाटपासाठी परत करण्यात येऊन त्याचे विनियोग दाखल्यासह अनुपालन लेखापरीक्षणास सादर करण्यात यावे.

---

**परिच्छेद क्रमांक २१ :- जामीनदार हयात व लायक असलेचे दाखले न घेणेबाबत...**

पंचायत समिती, देवळाचे सन २००७-०८ कालावधीतील खालील कर्मचा-यांचे जामीनदार हयात व लायक असलेचे दाखले घेणेत आलेले नाहीत.

| अ.क्र. | कर्मचा-यांचे नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्री. व्ही. के. निकम | ग्रामसेवक |
| २ | श्री. ए. व्ही. गोसावी | कनिष्ठ अभियंता यांत्रिकी |
| ३ | श्री. व्ही. पी. सोनारे | वाहनचालक (पंचायत समिती) |
| ४ | श्री. व्ही. एन. अहिरे | वाहनचालक (प्राथमिक आरोग्य केंद्र) |
| ५ | श्री. जे. एन. मोरे | वाहनचालक (प्राथमिक आरोग्य केंद्र) |
| ६ | श्री. डी. के. पठाडे | सहाय्यक पशुधन विस्तार अधिकारी |

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ चे नियम ४३(३) अन्वये प्रत्येक वित्तीय वर्षाचे सुरुवातीस जामीनदार हयात व लायक असल्याचे दाखले घेणे आवश्यक आहे. परंतु उपरोक्त नमुद केलेल्या कर्मचा-यांचे जामीनदार हयात व लायक असल्याचे दाखले घेणेत आलेले नाहीत. तरी उपरोक्त नियमाप्रमाणे कार्यवाही करुन अनुपालन लेखापरीक्षणांस दाखवावे.

---

**परिच्छेद क्रमांक २२ :- करारपत्राची नोंदवही न ठेवणेबाबत.**

जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ मधील नियम १४७ नुसार प्रत्येक मंजूर करारांची नमुना नंबर ४८ मध्ये नोंदवही परीरक्षीत करुन त्यामध्ये नोंद घेऊन प्रत्येक नोंदीखाली लेखाधिका-याने स्वाक्षरी केलेली नाही. त्यामुळे पंचायत समितीने आजपावेतो कोणत्या कामासाठी कोणत्या मक्तेदाराबरोबर करार केलेले होते, कराराप्रमाणे विहित वेळेत काम पूर्ण झाले किंवा कसे इत्यादीबाबतची पडताळणी करता आलेली नाही.

तरी आजपावेतो केलेल्या कराराबाबतच्या नोंदी नमुना नंबर ४८ मध्ये घेऊन त्या नोंदीखाली सक्षम प्राधिका-याची स्वाक्षरी घेऊन अनुपालन दर्शवावे.

---

**परिच्छेद क्रमांक २३ :- शिलकी रक्कमेची सुरक्षितता व पडताळणीबाबत.**

जिल्हापरिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ मधील नियम ४२ नुसार गटविकास अधिकारी यांनी प्रत्येक महिन्याच्या शेवटच्या कार्यदिनी शिलकी रक्कमेची तपासणी करावी. तसेच तीन महिन्यातून एकदा कोणत्याही अनिश्चित दिवशी शिल्लक रक्कम तपासून ती रक्कम कॅशबुकातील शिलकी रक्कमेशी जुळते याची खात्री करुन घ्यावी व तसे प्रमाणपत्र कॅशबुकमध्ये नोंदविण्यात यावे, अशी तरतुद असतांना पंचायत समिती, देवळाने अशापध्दतीने कार्यपध्दती केल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे शासकीय व्यवहारांवर योग्य प्रकारचे नियंत्रण

नाही. प्रभावी नियंत्रणाअभावी गैरव्यवहार करण्यास चालना मिळत असते. तरी याबाबत मुख्य लेखा व वित्त अधिका-यांचे क्षमापन घेऊन अनुपालन लेखापरीक्षणास दाखवावे.

---

**परिच्छेद क्रमांक २४ :- निवृत्ती वेतन प्रदान नोंदवही अपूर्ण असणेबाबत.**

जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ मधील नियम ३९ परिशिष्ट ४ मधील नियमान्वये पंचायत समितीत येणा-या प्रत्येक मागणी बिलाची व नोंदवहीची गट विकास अधिकारी याने प्रदान आदेशावर सही करण्यापूर्वी कनिष्ठ लेखा अधिका-यांकडून तपासणी होणे आवश्यक आहे.

पंचायत समिती चांदवड यांचेकडील गटशिक्षण अधिकारी यांचे कार्यालयांतील निवृत्ती वेतन देयके, निवृत्ती वेतन लेखापरीक्षण नोंदवही (ए.पि.पि.९) आणि उपदान व अंशराशीकरण नोंदवही (नमुना ए.पी.पी. १०) यांची तपासणी केली असता त्यामध्ये खालीलप्रमाणे अपूर्णता व तृटी आढळून आलेल्या आहेत.

१. नमुना ए.पी.पी. ९ मधील लेखा परीक्षण नोंदवहीत निवृत्ती वेतनाचा प्रकार, निवृत्ती वेतन सुरु झाल्याचा दिनांक, अशंराशीकरण केलेली रक्कम व प्रदानाचा दिनांक, मुळ निवृत्ती वेतन, अशंराशीकरणानंतरची रक्कम, महागाई भत्त्याचे दर, मासिक एकत्रित निवृत्ती वेतन / कुटूंब निवृत्ती वेतनाचे दर, निवृत्ती वेतनधारक मृत्यू पावल्यास मृत्यूची नोंद, वारसांची नोंद, प्रत्येक महिन्यांत किती निवृत्ती वेतन प्रदान केलेले याची नोंद व तपासणी केल्याबद्दल लेखाधिकारी यांची स्वाक्षरी, जिवीत प्रमाणपत्राची नोंद, पुनर्विवाहाची / पुनर्नियुक्तीची नोंद, वयांची ६५ वर्षे पूर्ण किंवा मृत्यूनंतर ७ वर्षे यांपैकी जे अगोदर घडले असेल इत्यादी संबंधीच्या तारखा, मृत्यूनंतरच्या जादा प्रदान केलेल्या रक्कमा बॅंकेकडून परत मागवून शासन सदरी भरणा केल्याबद्दलच्या चलनासह नोंदी, अशंराशीकरणानंतर १५ वर्षांनी पुनर्स्थापना केल्याबाबतच्या नोंदी, चौथ्या, पाचव्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार सुधारीत निवृत्ती वेतन आदेशाप्रमाणे सुधारीत निवृत्ती वेतन / कुटूंब निवृत्ती वेतनाच्या नोंदी बॅंकेचे नाव व खाते क्रमांक इत्यादी नोंदी परिपूर्ण घेण्यांत आलेल्या नसल्यामुळे निवृत्ती वेतन धारकांस / कुटूंब निवृत्तीवेतनधारकांस योग्य प्रदान झाले किंवा कसे याबाबत लेखापरीक्षणांत परिपूर्ण पडताळणी करता आलेली नाही.

२. बॅंकेमार्फत निवृत्तीवेतन घेणा-या निवृत्तीवेतनधारकास प्रत्येक वर्षी जीवीत प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. जीवीत प्रमाणपत्र सादर केलेले नसल्यास त्या निवृत्ती वेतन धारकास निवृत्ती वेतन प्रदान करण्याचे थांबवावे, असे नियम असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केल्याचे तपासणी आढळून आलेले नाही.

३. नियम ८० अन्वये ज्या कुटूंब निवृत्तीवेतनधारकाचे निवृत्ती वेतन विवाहानंतर व पुनर्विवाहानंतर बंद होणार आहे. त्यांच्याकडून नमुना ए.पी.पी. १४ मध्ये दर सहामाहीस प्रतिज्ञापत्र मागविण्यांत येऊन ते डिसेंबर व जून मध्ये देय होणा-या निवृत्ती वेतन बिलासोबत जोडण्यांत यावे. असे प्रमाणपत्र देण्यात कसून झालेल्या प्रकरणांचे सविस्तर विवरण जानेवारी व जूलै महिन्यांत मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचकडे सादर करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

४.	निवृत्ती वेतन आदेशांत निवृत्ती वेतन धारकांचे फोटो, स्वाक्षरीचे नमुने, सुधारीत निवृत्ती वेतनाचे आदेश इत्यादी प्रकारचे अत्यावश्यक कागदपत्रे नस्तीबध्द केलेली नाहीत.

५.	निवृत्ती वेतन बिल, निवृत्ती वेतन प्रदान आदेश व निवृत्त वेतन लेखा परीक्षा नोंदवहीतील नोंदी यामध्ये संदर्भिय नोंदवही क्रमांक, पृष्ठ क्रमांक यांची नोंद घेण्यात आलेली नाही. त्यामुळे संदर्भाकिंत लेखे तपासणीस लेखा परीक्षणात बराच कालावधी व श्रम व्यर्थ खर्च करावे लागत आहेत.

सदरचे नमुना ए.पी.पी. ९ व इतर अभिलेखे वेळीच पूर्ण न केल्याने योग्य प्रदाने झाल्याची पडताळणी लेखापरीक्षणांस करता आली नाही. या महत्त्वाच्या नोंदवह्या अपूर्ण ठेवणे ही बाब अतिशय गंभीर स्वरुपाची आहे. याबाबत संबंधित कर्मचारी व अधिकारी यांचेवर जबाबदारी निश्चित करावी.

उपरोकत आक्षेपांबाबत अंतर्गत लेखापरीक्षणाकडून उचित पडताळणी करुन त्यांचा अहवाल व त्यावरील कार्यवाही अहवालासह निवृत्ती वेतन लेखा परीक्षा नोंदवही व सर्व आदेश नोंदवहीसह अद्ययावत पुर्तता लेखापरीक्षणांस दर्शवावी.

---

**परिच्छेद क्रमांक २५ :- अग्रीम व अनामत नोंदवही अपूर्ण असलेबाबत.**

पंचायत समिती, देवळाचे सन २००७ – २००८ चे लेखापरीक्षण केले असता अग्रीम व अनामत नोंदवही अपूर्ण असल्याचे आढळून आले. नोंदवह्यांमध्ये गटविकास अधिकारी यांच्या सह्या नाहीत, रकाने पूर्ण भरलेले नाहीत, गोषवारे काढलेले नाहीत. त्यामुळे अग्रीम रक्कमांबाबत किती रक्कमा, किती वर्षापासून थकीत आहेत. तसेच अनामत रक्कमांबाबत एकूण किती रक्कम अनामत सदरी जमा असून, किती रक्कमा तीन वर्षावरील किती थकीत आहेत. ज्या रक्कमा व्यपगत करण्यायोग्य आहेत, त्या सभेच्या मंजूरीविना प्रदान केल्या किंवा कसे? याबाबत खात्री करता आली नाही. सदर बाब ही गंभीर स्वरुपाची असून सदरबाबत संबंधितांची जबाबदारी निश्चित करण्यांत यावी. अग्रीम व अनामत नोंदवही पूर्ण करुन अनुपालन लेखापरीक्षणास दाखवावे.

---

**परिच्छेद क्रमांक २६ :- दलित वस्ती सुधार योजना अंतर्गत अपूर्ण कामांबाबत.**

सोबत जोडलेले परिशिष्ट क्रमांक २(१) नुसार दलित वस्ती सुधार योजनेमधील अपूर्ण कामावर रक्कम रुपये १२,८०,०००/- खर्च करण्यात आलेला आहे. सदरची कामे त्वरीत पूर्ण करुन अनुपालन लेखापरीक्षणांस सादर करण्यांत यावे.

---

**परिच्छेद क्रमांक २७ :- अपूर्ण जवाहर विहीरींबाबत.**

लघुपाटबंधारे उपविभागाकडील दिनांक ३१.३.२००८ अखेर पर्यंत १३ जवाहर विहीरींची सोबत जोडलेले परिशिष्ट क्रमांक २(२) मध्ये नमुद केलेली कामे अद्याप अपूर्ण असून

त्यावर रक्कम रुपये २,०४,८६६/- खर्च करण्यांत आलेला आहे. त्यावर खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यांत येत आहेत:

१) सदरच्या विहीरी सन २००३ – २००४ पासून अपूर्ण असल्याने प्रत्येक लाभार्थ्यांकडून विहीत मुदतीत पूर्ण न झालेल्या कालावधीपासून अवर सचिव, नियोजन विभाग, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई यांचे आदेश क्रमांक ६५ दिनांक १३.९.२००१ नुसार दिलेल्या अनुदानासह १८% दराने दंड वसूल करण्यांत यावा.

२) माहे मार्च २००८ अखेर खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे असल्याचे आढळून आले.

| प्राप्त अनुदान | खर्च | शिल्लक अनुदान |
|---|---|---|
| ५,७८,००० | १,५१,४८८ | ४,२६,५१२ |

सदरचे शिल्लक अनुदान शासनास परत करण्यात आलेले नाही. ते लेखापरिक्षण कालावधी पावेतो पंचायत समिती निधीत शिल्लक आहे. शिल्लक अनुदान शासनास त्वरीत परत करणे आवश्यक असतांना ते परत न करणेबाबत संबंधितांची जबाबदारी निश्चित करण्यांत यावी.

३) अपूर्ण बांधकामानुसार एकूण १३ जवाहर विहीरींची कामे अपूर्ण असतांना व अनुदान उपलब्ध शिल्लक असतांना सदर विहीरींचे कामे पूर्ण न करणेबाबत संबंधितांची जबाबदारी निश्चित करण्यांत यावी.

४) सन २००३ – २००४ पासून एकूण १३ विहीरींची कामे अपूर्ण असून ही अतिशय गंभीर स्वरुपाची बाब आहे. या अपूर्ण कामावर रक्कम रुपये २,०४,८६६/- अनुदान खर्च होउुन सुध्दा योजनेचा लाभ विषयक मुळ उद्देश सफल होत नाही. याबाबत संबंधितांची जबाबदारी निश्चित करुन उचित कार्यवाही करण्यांत यावी. तसेच नविन विहीरींचे कामांना मंजूरी देणेपूर्वी अपूर्ण विहीरी पूर्ण करण्यासाठी प्रयत्न व्हावेत.

५) महाराष्ट्र शासन, नियोजन विभाग आदेश क्र. नाशिक/नाविका/१२९८/प्र.क्र.१०४/ रोहयो १०/दिनांक १.७.१९९८ मधील परिच्छेद क्रमांक १७ व १८ नुसार विहीरींचे काम प्रशासकीय मान्यतेच्या आदेशातील दिनांकापासून दोन महिन्यांचे आंत सुरु करुन पुढील १२ महिन्यांचे आंत काम पूर्ण करावयाचे असतांना व अनुदान उपलब्ध असतांनाही वरील प्रकरणी शासन आदेशाची पालन झालेले नाही. याबाबत ग्रामविकास व जलसंधारण विभागाचे क्षमापन घेऊन अनुपालन दर्शवावे.

उपरोक्त नमुद आक्षेपांची पुर्तता करुन अनुपालन लेखापरीक्षणांस दाखविण्यांत यावे.

---

**परिच्छेद क्रमांक २८ :- कृषि विभाग अपूर्ण विहिरींबाबत**

सोबत जोडलेले परिशिष्ट क्रमांक २ (३) नुसार दिनांक ३१.३.२००८ अखेर विशेष घटक योजनेंतर्गत २ विहिरींची कामे अपूर्ण असुन त्या कामांवर रक्कम रुपये ४६,२०४/- खर्च करण्यात आलेला आहे

सदर खर्चावर खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

१) महाराष्ट्र शासन नियोजन विभाग आदेश क्रमांक नाशिक जाविका १२९८/प्र.क्र.१०४/ रोहयो/१० दिनांक १.७.१९९८ मधील परिच्छेद क्रमांक १७ व १८ नुसार विहिरीचे काम प्रशासकीय मान्यतेच्या आदेशातील दिनांकापासुन दोन महिन्याचे आत सुरु करुन पुढील १२ महिन्याचे आत पूर्ण करावयाचे असतांना याप्रकरणी शासनाचे आदेशाचे पालन झालेले नाही. यातुन प्रशासनाची अकार्यक्षमता स्पष्ट होते.

३) अपूर्ण विहिरीवर शासकीय अनुदान रक्कम रुपये ४६,२०४/- खर्च होऊन सुध्दा योजनेचा हेतु सफल होत नाही. नविन विहिरींच्या कामांना मंजुरी देणेपूर्वी अपूर्ण विहिरी पूर्ण करण्यासाठी प्रयत्न व्हावेत.

उपरोक्त नमुद आक्षेपांची पूर्तता करुन अनुपालन लेखापरीक्षणास सादर करण्यात यावे.

**परिच्छेद क्रमांक २९ :- रोखवहीत पांढरी शाई (व्हाईटनर) चा वापर करणेबाबत.**

रोखवहीत ब-याच ठिकाणी पांढी शाई (व्हाईटनर) लावलेली असल्याचे आढळून आले. (उदा. दि. ३१.३.२००८ ची अभिकरण योजना रोखवही पृ.क्र. ७७, जिल्हा निधी पृ.क्र. ८६, जि.प.सेस पृ.क्र.८३) रोखवहीतील व्यवहार पांढरी शाई लावून खोडणे नियमबाह्य व संशयास्पद असून याबाबत संबंधितांची जबाबदारी निश्चित करण्यांत येवुन मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचे क्षमापन प्राप्त करुन अनुपालन दर्शवावे.

**परिच्छेद क्रमांक ३० :- १२ व्या वित्त आयोगाबाबत.**

लेखाविभागाने १२ व्या वित्त आयोगाअंतर्गत प्राप्त अनुदानाच्या नोंदी जमा नोंदवही (नमुना नंबर १३) व खर्चाचे नोंदी खर्चाची नोंदवही (नमुना नंबर १४) मध्ये केलेल्या नाहीत. तरी सदर नोंदवहीत अद्ययावत नोंदी घेऊन अंतर्गत लेखापरिक्षणाच्या पडताळणी अंती अनुपालन लेखापरीक्षणांस दाखविण्यांत यावे.

**परिच्छेद क्रमांक ३१ :- अर्धसमासिय पत्रास उत्तरे सादर न करणेबबत.**

लेखापरीक्षण कालावधीत खालील अर्धसमासिय पत्राद्वारे मागविण्यांत आलेली माहिती / कागदपत्रे लेखापरीक्षणांस सादर करण्यांत आलेली नाहीत.

| अ. क्र. | अर्धसमास पत्र क्र. | दिनांक | मागविण्यांत आलेली माहिती / कागदपत्रे |
|---|---|---|---|
| १ | ५ | २९.८.२००८ | १२ वा वित्त आयोगाअंतर्गत ग्रामपंचायतीला दिलेले अनुदान व नमुना नंबर ७ ची पावती. |
| २ | ८ | २९.८.२००८ | कृषी विभागाकडील १) प्राप्त निविदा रक्कम<br>२) बायोगॅस दुरुस्तीचे लक्षांक, खर्च |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | ३) नैसर्गिक आपत्तीमधील प्राप्त अनुदान, खर्च, पंचनामे, विमा इत्यादी माहिती. |
| ३ | ९ | २९.८.२००८ | कृषी विभाग, प्राप्त निविष्ठा, कंत्राट, पेरणी कालावधी नंतर वाटप निविष्ठा व त्यावरील खर्च |
| ४ | १३ | २९.८.२००८ | बांधकाम विभाग अ.क्र. १ ते ७ माहिती |
| ५ | १५ | २९.८.२००८ | पशुसंवर्धन विभागात दिलेले लक्षांक / पूर्ण लक्षांक माहिती |
| ६ | १८ | २९.८.२००८ | अपारंपारिक उर्जाबाबत. |
| ७ | २७ | २९.८.२००८ | वाहन दुरुस्ती व इंधन खर्चाबाबत |
| ८ | ३३ | २९.८.२००८ | जिल्हा परिषद यंत्र सामुग्रीबाबत |
| ९ | ४२ | २९.८.२००८ | ज.रो.यो. (ल.पा) पूर्ण विहीरीची माहिती |
| १० | ४३ | २०.९.२००८ | संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना ग्रामपंचायतींना वाटप धान्य कुपनाबाबत माहिती. |

वरीलप्रमाणे अर्धसमासिय पत्रान्वये मागविण्यांत आलेली माहिती / लेखे तपासणीस उपलब्ध न केल्याने लेखापरीक्षणांस अंतिम निर्णयाप्रत जाता आलेले नाही. त्यामुहे उपरोक्त नमुद बाबी संबंधातील खर्चाबाबतची अचुकता पडताळून पाहता आली नाही. याबाबत स्थानिक निधी लेखा परिक्षा अधिनियम १९३० चे कलम ७ अन्वये मा. विभागीय आयुक्त त्यांचेकडे संबंधितांवर दंडनीय कारवाईसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे. त्यावरील मा. आयुक्तांचे आदेशांन्व्ये कार्यवाही पूर्ण करुन अनुपालन दर्शवावे.

**परिच्छेद क्रमांक ३२ :- आक्षेप विवरणपत्र.**

किरकोळ स्वरुपाच्या आक्षेपांची पूर्तता लेखापरीक्षण कालावधीत करुन घेण्यात आल्याने आक्षेप विवरणपत्र निर्गमित करणेत आलेले नाही.

**परिच्छेद क्रमांक ३३ :- विवरणपत्रे.**

या अहवालासोबत आवश्यक ती नियमीत विवरणपत्रे जोडण्यात आलेली आहेत.

**परिच्छेद क्रमांक ३४ :- वार्षिक लेखे.**

या लेखा परीक्षण अहवालातील आक्षेपांवरील संपूर्ण पुर्ततेच्या अधिन राहुन आणि लेखापरिक्षीत निवडक महिन्यांशिवाय इतर महिन्यांमध्ये अंतर्गत लेखापरीक्षणामध्ये कुठलीही गंभीर अनियमितता स्पष्ट झालेली नाही यास अधीन राहून, या पंचायत समितीचे सन २००६-२००७ चे वार्षिक लेखे बरोबर असल्याचे प्रमाणीत करणेत येते.

**परिच्छेद क्रमांक ३५ :- लेख्यांची स्थिती.**

पंचायत समितीची लेखा स्थिती सर्वसाधारण चांगली आहे. लेख्यांच्या स्थितीमध्ये अधिक सुधारणा करणेत यावी.

---

**परिच्छेद क्रमांक ३६ :- अनुपालन व पोहोच.**

या लेखा परीक्षण अहवालातील आक्षेपांवरील अनुपालन अहवाल, मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम १९३० चे कलम १०(१) प्रमाणे, प्रस्तुत लेखा परीक्षण अहवाल प्राप्त झालेपासुन चार महिन्याच्या आत, पंचायत समितीच्या ठरावाच्या प्रतीसह तीन प्रतीत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांचे स्वाक्षरीने या कार्यालयाकडे पाठविण्यांत यावा. तसेच हा अहवाल प्राप्त झाल्याचा दिनांक कळवुन पोहोच देणेत यावी.

उपमुख्य लेखा परीक्षक
स्थानिक निधी लेखा, नाशिक

**प्रत सविनय सादर :-**

१. मा.सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई (पत्राने)
२. मा.महालेखापाल, बाहय लेखा परीक्षण विभाग, मुंबई
३. मा.आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक.
४. मा.मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, महाराष्ट्र राज्य, नवीमुंबई
५. मा.उपमुख्य लेखा परीक्षक(वरिष्ठ), स्थानिक निधी लेखा, नाशिक विभाग, नाशिक.

**प्रत अग्रेषित :**

६. म.उपमुख्य लेखा परीक्षक(प.रा.स.), स्थानिक निधी लेखा, मुंबई
७. म.गटविकास अधिकारी, पंचायत समिती, देवळा जिल्हा नाशिक

उपमुख्य लेखा परीक्षक
स्थानिक निधी लेखा, नाशिक